
# प्रकरण सहावे

# निष्कर्ष



# प्रकरण सहावे

## निष्कर्ष

## - अनुक्रमणिका -


| अ. क्र. | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ६.१ | प्रस्तावना | १६६ |
| ६.२ | प्रकरण निहाय सारांश | १६६ |
| ६.३ | ठळक निष्कर्ष | १७८ |
| ६.४ | नवे प्रमेय | १८४ |
| ६.५ | उपलब्धी | १८५ |
| ६.६ | भावी संशोधनासाठी नव्या दिशा | १८६ |

# - प्रकरण सहावे -
# निष्कर्ष

## ६.१ प्रस्तावना

मुंबईच्या वॅटसन हॉटेलमध्ये फ्रान्सच्या ल्युमियर ब्रदर्सनी भारताच्या भूमीवर पहिले मूकपट प्रदर्शन केले. सगळ्या कलाकारांना हजारो वर्षांचा इतिहास आहे; परंतु सर्व कलांचा संगम असलेली चित्रपटकला जवळपास शंभरी ओलांडलेली आहे. अतिशय गतीने या कलेचा विकास झाला. विज्ञान आणि तंत्रज्ञानावर आधारित आणि सामाजिक जीवनाशी समीपता दाखवणारी अशी ही कला. या कलेचे भारतात सर्वप्रथम स्वागत महाराष्ट्राने केले.

मराठी चित्रपटाचा इतिहास माहीतीपटाच्या निर्मितीपासून सुरु झाला. हा माहीतीपट 'नारळी पौर्णिमा' या नावाने सावे दादांनी कॅमेऱ्याचा वापर करुन इ.स. १८९६ साली काढला. कला आणि व्यवसाय ही या चित्रपटकलेची दोन महत्त्वाची अंगे आहेत. या दोन्ही दृष्टीकोनातून भारतीय चित्रपटांचा पाया मराठी चित्रपटाने घातला. इतकेच नव्हे तर अनेक पहिले विक्रम मराठी निर्माते-दिग्दर्शकांच्या चित्रपटांनीच केले.

मराठी चित्रपटांना पालक किंवा गुरुचं स्थान असताना आजचा मराठी चित्रपट कोणत्या पायरीवर आहे? त्याची स्थिती आणि गती काय व कशी आहे? याचा शोध आणि बोध घेणे महत्त्वाचे वाटले आणि त्यामुळेच मराठी चित्रपट निर्मिती प्रक्रियेतील समस्यांचा शोध घेऊन त्यावर काय उपाययोजना करता येतील या उद्देशाने हा लघुशोधप्रबंध साकाराला आहे. यासाठी हा लघुशोधप्रबंध एकूण सहा प्रकरणांत विभागलेला आहे. पहिली पाच प्रकरणे आणि शेवटचे सहावे निष्कर्षाचे प्रकरण, यात प्रथम पूर्वीच्या पाच प्रकरणांचा सारांश आणि मग निष्कर्ष इ. गोष्टींचा अंतर्भाव आहे.

## ६.२ प्रकरण निहाय सारांश

या प्रबंधात अभ्यासलेल्या विविध प्रकरणांचा थोडक्यात सारांश पाहिला असता त्यातून काही ओघवती माहीती थोडक्या वेळात नजर फिरवून मिळविता येईल, तसेच काही तथ्येही समोर येतील. हा आढावा घेत असताना आवश्यक ती माहीती थोडक्यात

मांडण्याचा प्रयत्न केला आहे. पूर्वी प्रत्येक प्रकरण सविस्तर आणि सखोल मांडलेले आहे त्याचा हा प्रकरणनिहाय थोडक्यात गोषवारा.

## प्रकरण पहिले - संकल्पना.

आधुनिक काळात चित्रपट हे एक प्रभावी माध्यम बनलेले आहे. नवीन सहस्रकात इ.स. २००० पासून चित्रपटाचे स्वरुप झपाट्याने बदलत चालले आहे. आजच्या या जागतिकीकरणाच्या लाटेत इंग्रजी चित्रपटांप्रमाणेच भारतीय भाषेतील चित्रपटही बदलत आहेत. हिंदी भाषेतील चित्रपटांप्रमाणेच मराठी भाषेतील चित्रपटांच्या निर्मितीमध्येही अनेक नवे नवे प्रयोग केले जात आहेत. तथापी मराठी चित्रपटांची निर्मिती ही तेलगू आणि तामिळ भाषांतील चित्रपटांच्या तुलनेत अधिक अडचर्णीग्रस्त झाल्याचे दिसून येते.

यामुळेच मराठी चित्रपटांच्या निर्मितीमधील समस्यांचा शोध घेणे व त्यावरील उपाय सूचित करणे हा या संशोधनाचा हेतू येथे स्पष्ट केला आहे.

चित्रपटाच्या निर्मितीप्रमाणेच उद्दीष्ट्य व हेतूमध्येही अनेक महत्त्वाचे बदल झाले आहेत. या हेतूंचे साफल्य किती? प्रबोधनमूल्य श्रेष्ठ की मनोरंजनमूल्य श्रेष्ठ? हे निरंतर चर्चेचे विषय आहेत पण चित्रपटांसारख्या भांडवलप्रधान व्यवसायात खरी समस्या आहे निर्मितीची. त्यातही प्रादेशिक भाषेतील चित्रपट निर्मिती व त्यानंतर वितरण ही तर एक डोकेदुखीच बनली आहे.

मराठी चित्रपट निर्मितीसमोरील जटील समस्यांचा शोध हा प्रमुख हेतू असल्याचे येथे स्पष्ट केले आहे.

पैसा, प्रसिद्धी आणि ग्लॅमर या तीन गोष्टींच्या प्रभावाखाली चित्रपटसृष्टी आहे. एक चित्र हजारो शब्दांपेक्षा जास्ती आशय व्यक्त करते आणि चित्रपटात तर अशी असंख्य चित्रांची मालिकाच शास्त्रोक्त आणि कलात्मक रितीने गुंफलेली असते. जी रसीकांना जाग्यावर खिळवून ठेऊ शकते. यामुळेच चित्रपट हे जनसंवादाचे फार महत्त्वाचे असे साधन आहे.

चित्रपट हे प्रबोधनपर माध्यम कसे आहे याचे येथे विश्लेषण केले आहे. चित्रपट म्हणजे मानवी भावभावनांचा रसिकतेने चित्रीकरण केलेले नाट्य आहे तसेच

आबालवृद्धांपर्यंत सर्वांनाच चित्रपट या माध्यमाने कसे आकर्षित केले आहे त्याचे वर्णन येथे केले आहे.

या ठिकाणी माधव शेवाळे, प्रा. मॅक्विल, रविप्रकाश कुलकर्णी, वसंत साठे आणि अभिजीत देसाई यांच्या भाषेत चित्रपट माध्यमांची वैशिष्ट्ये कशी कथन केली आहेत त्याचा परामर्श घेतला आहे. शोभा चटर्जी यांनी एक माध्यम म्हणून चित्रपटाकडे कसा अंगुलीनिर्देश केला आहे ते पाहिले आहे.

दादासाहेब फाळके यांनी पहिला चित्रपट 'राजा हरिश्चंद्र' १९१३ मध्ये बनविला. तेव्हापासून ते आजच्या सहस्त्रकातील २००५ पर्यंतच्या व आत्ताच्या घटकेपर्यंतच्या चित्रपटांचे बदलते स्वरूप याचाही धावता आढावा याठिकाणी घेण्यात आला आहे.

यानंतर मराठी चित्रपट निर्मिती प्रक्रिया सुरुवातीपासून शेवटापर्यंत म्हणजे निर्मितीच्या संकल्पनेपासून पडद्यावर चित्रपट प्रदर्शित होईपर्यंतच्या घडामोडी सविस्तरपणे वर्णिल्या आहेत.

सर्वसाधारणपणे मराठी चित्रपट निर्मिती प्रक्रियेसमोर कोणकोणत्या प्रमुख समस्या आहेत यांचा आढावा घेण्यात आला आहे. यानंतर चित्रपट अभ्यासाचे महत्त्व सांगितले आहे. चित्रपट संवाद आणि जनसंवाद यांच्या परस्पर संबंधांचे वर्णन करून भावी दिशा आणि नवे प्रवाह सांगून समारोप केला आहे.

शेवटी संदर्भसूची अनुक्रमानुसार दिली आहे.

## प्रकरण दुसरे - संशोधन पद्धती

मराठी चित्रपटांच्या निर्मिती प्रक्रियेतील समस्यांचा शोध हा सामाजिक संशोधनाचा विषय आहे आणि त्यामुळे प्रस्तावनेतच सामाजिक संशोधनाच्या अंगोपांगांची चर्चा केली आहे.

चित्रपट ही सामाजिक संस्था असून या संस्थेची निर्मिती ही विविध समाज घटकांना एकत्र आणून केलेली असते त्यामुळे हे संशोधन सामाजिक संशोधन ठरते. हे या ठिकाणी स्पष्ट केले आहे.

या ठिकाणी पु.ल. भांडारकर, जे. डब्ल्यू. बेस्ट, कॉफमन, स्लेसिंजर आणि स्टिफेन्सन यांची मते पुष्ट्यर्थ दिली आहेत.

नव्याने उजेडात आलेल्या तथ्यांच्या आधारे प्रस्थापित, स्वीकृत निष्कर्ष व सिद्धांताचे पुन: परिक्षण करण्याच्या हेतूने चिकित्सक व सखोल चौकशी वा प्रयोग (Experiment) म्हणजेच संशोधन हे या ठिकाणी स्पष्ट केले आहे.

यानंतर चित्रपट संशोधन या विषयाचा परामर्श घेतला आहे. यानंतर मराठी चित्रपट व्यवसायाचे चढ-उतार यांचा अभ्यास सादर केला आहे.

यानंतर या संशोधनासाठी वापरण्यात आलेला- 'अन्वेषणात्मक संशोधन आराखडा' याचे समग्र विश्लेषण केले आहे. पु.ल. भांडारकर, काट्झ, सेल्टीझ, जहोडा व कुक यांच्या मतांचाही येथे अभ्यास केला आहे. या आराखड्यांतर्गत तीन टप्पे-(अ) साहित्य सर्वेक्षण (ब) अनुभव सर्वेक्षण आणि (क) अंतर्दृष्टीस प्रेरणा देणारे घटक यांचा समग्र आढावा घेण्यात आला आहे.

**(अ) साहित्य सर्वेक्षण** (Survey of Literature)

ग्रंथ हे अनुभवी सजीवांनी लिहिलेली अचल अशी मार्गदर्शक निर्मिती आहे. आदिम अवस्थेपासून आजच्या एकविसाव्या शतकापर्यंतची मानवाची प्रगती होण्यात साहित्याचा फार मोठा वाटा आहे. मानवाच्या आयुष्याला मर्यादा आहेत पण अनुभव मात्र अमर्याद आहेत. हे अनुभवांचं विश्व समकालीन साहित्यातून प्राप्त होते तसेच ते पिढ्या न् पिढ्या संक्रमित होणारे ज्ञान आहे.

साहित्याच्या सर्वेक्षणामुळे त्या त्या विषयाला लागणारे पूर्वज्ञान प्राप्त होते. अशा पारंपारिक ज्ञानाशिवाय किंवा सैद्धान्तिक आधाराशिवाय शोधकार्य करणे म्हणजे अंधारात चाचपडणे होय.

संशोधन करावयाच्या विषयाला सर्वार्थाने माहितीचा पुरवठा होईल ते ते सर्व या साहित्य सर्वेक्षणाच्या कक्षेत येते. चरित्रग्रंथ, वर्णनात्मक ग्रंथ, समीक्षात्मक ग्रंथ इतकेच नव्हे तर विविध मासिके, वृत्तपत्रातील लेख, नभोवाणी दूरदर्शन इ. वरील मुलाखतींचे तसेच इतर विषयांशी संबंधीत अहवाल यांचाही यात समावेश होतो. इतकेच काय चित्रपट हा विषय सामाजिक अंगच असल्याने सामाजिक विषयांना धरून असणारे लेखनही साहित्य सर्वेक्षणाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे.

**(ब) अनुभव सर्वेक्षण** - Experience Survey.

भांडारकरांच्या मते,

**''संशोधनकर्ता जे विषयक्षेत्र निवडतो त्या त्याच्या बाबतीत इतरांना काय माहिती आहे किंवा इतरांचा काय अनुभव आहे हे संशोधनकर्त्याने जाणून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे.''**

म्हणूनच प्रस्तुत शोध प्रबंधांसाठी पुढील घटकांशी संपर्क साधून सर्वतोपरी सखोल माहिती घेण्याचा प्रयत्न केला आहे. चित्रपटाशी संबंधीत तंत्रज्ञ, कलावंत, समीक्षक, पत्रकार, रसीक तसेच जाणकार आणि इतर अभ्यासू व्यक्तिमत्त्व यांच्यापर्यंत जाऊन माहितीचे संकलन केले आहे.

या अभ्यासात मराठी चित्रपट निर्मिती प्रक्रिया व चित्रपटांचे यशापयश यांचा मागोवा घेण्यासाठी प्रश्नावलीचा उपयोग करून सर्वेक्षण केले आहे व ही प्रश्नावली समस्येच्या मुळाशी जाईल याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे.

**(क) अंतर्दृष्टीस प्रेरणा देणारे घटक** - (Insight Stimulating Factors)

कधी कधी अभ्यासविषयाशी संबंधीत असे अन्य विषय असतात की ज्यामुळे अभ्यासकाची व्यावहारिक अंतर्दृष्टी विकसीत होऊ शकते. ही अंतर्दृष्टी गृहीतकृत्य निर्माण करण्यास वा वास्तविक संशोधन करण्यास सहाय्यक होते. काही घटना अतिशय सरळ व स्पष्ट असतात. काही व्यक्तिंच्या ठिकाणी विशेष गुण असतात. या सर्वांच्या निरिक्षणामुळे अभ्यासकाची अंतर्दृष्टी विकसीत होते, प्रोत्साहित होते. नवीन कल्पना सुचतात. सर्वव्यापक दहा प्रश्नांच्या आधारे अशा दहा तज्ज्ञ व्यक्तिंची प्रत्यक्ष मुलाखत घेऊन अभ्यासपूर्ण माहीती मिळविली.

यानंतर या लघुशोधप्रबंधाची उद्दिष्टे आणि गृहीतके मांडली आहेत आणि संशोधनाची बैठक स्पष्ट केली आहे.

नमुना निवडीचे तंत्र, याचा उहापोह करताना यंग, गुडे आणि हॅट तसेच पु.ल. भांडारकर यांच्या मतांचा अभ्यास केला आहे.

प्रस्तुत शोधप्रबंधासाठी साधा यादृच्छिक नमुना (Simpal Random Sampling) पद्धत वापरली आहे.

संशोधनाच्या मर्यादा स्पष्ट करुन सामुग्रीचे विश्लेषण, निर्वचन आणि अहवाल लेखन याविषयी चर्चा केली आहे. समारोपानंतर अनुक्रमानुसार संदर्भसूची दिली आहे.

## प्रकरण तिसरे - प्रकाशित साहित्याचे समालोचन

माणूस हा बुद्धीप्रधान प्राणी आहे. तसेच तो समाजप्रिय प्राणीही आहे. मानवांच्या समुहामुळे समाज बनत असतो. जीवनानुभवांची परिणती साहित्यात होत असते. शिक्षण किंवा अनुभव संक्रमणाचे मौखिक आणि लेखी हे दोन मोठे आधार आहेत. अनुभव आणि अनुभवजन्य ज्ञान दुसऱ्याला द्यावे हा उपजत मनुष्यस्वभाव आहे.

चित्रपट हे दृक्‌श्राव्य माध्यम आहे. तसेच ते जनसंवादाचे एक प्रभावी माध्यम आहे. साहित्याने जीवनाची सर्व अंगे व्यापलेली आहेत. चित्रपट विषयक साहित्य त्यामुळेच अतिशय महत्त्वाचे असे ज्ञान मिळविण्याचे साधन झाले आहे.

साहित्याचा हेतूच ज्ञानसंक्रमण आहे. लिखीत ज्ञान एका व्यक्तीकडून एक वा अनेक व्यक्तिंपर्यंत तसेच एका पिढीपासून अनेक पिढ्यांपर्यंत प्रवाहीत होत राहते.

म्हणूनच चित्रपट कला आणि एकूणच रसीकमान्य कलांवरील साहित्य हे सर्वतोपरी सहाय्यक आणि उपकारक आहे. ज्यांना प्रत्यक्षात गुरु सान्निध्य नाही अशांना ग्रंथ हेच गुरु आहेत. दादासाहेब फाळके, सत्यजीत राय, व्ही. शांताराम यासह अनेक दिग्गजांनी या साहित्याच्या आधारेच आपल्या ज्ञानाच्या कक्षा वाढविल्या आणि मग एकापेक्षा एक सकस अशा कलाकृती समाजापुढे सादर केल्या.

चुका आणि शिका या तत्त्वाप्रमाणेच वाचनाने चुका सुधारत पुढे जाण्यात साहित्य मदत करते. बाबूराव पेंटरांनी कॅमेरा या विषयक माहीती वाचून आणि प्रत्यक्षात कॅमेरा खोलून पाहून भारतातच स्वत:चा कॅमेरा बनविला आणि मग त्या कॅमेऱ्यानेच चित्रीकरण केले हा सर्वश्रुत इतिहास आहे.

चित्रपट विषयक साहित्य, तंत्रज्ञ, कलाकार तसेच इतर रसीकजन यांनाही उपयुक्त आहे. कोठे आहोत? आणि कोठे जावयाचे? याची उत्तरे अशा साहित्यामुळेच मानवाला मिळतात.

यानंतर मराठी चित्रपट विषयक साहित्याच्या संदर्भातील माहीती या ठिकाणी दिली आहे. उपलब्ध ग्रंथांचे वर्गीकरण व त्याचे विविध प्रकारही या ठिकाणी दिले आहेत.

शास्त्रीय ग्रंथ, चरित्रात्मक ग्रंथ, अनुभवकथनपर ग्रंथ, समीक्षात्मक ग्रंथ आणि चित्रपटांच्या विविध पैलूंवर आधारित ग्रंथ यांचे वर्णनही केले आहे.

यानंतर चित्रपटविषयक प्रकाशित साहित्याचा धावता आढावा सादर केला आहे.

**शांता आपटे** यांनी **'जाऊ मी सिनेमात'** हे आपले आत्मचरित्र १९४० साली प्रसिद्ध केले. या पुस्तकातून शांता आपटे यांनी आपले चित्रपट विषयक अनुभव आणि विचार मांडले आहेत. शांताबाई पडद्यावर आणि पडद्याबाहेरही बंडखोर अभिनेत्री म्हणून प्रसिद्ध होत्या. बोलपटाचे वय जेमतेम ८ ते १० वर्षे आणि सिनेमाला प्रतिष्ठा नव्हती, या काळातील हा धाडसी प्रयत्न.

**बाबूराव पेंढारकर** यांनी ६१ साली लिहीलेले **'चित्र आणि चरित्र'** हे मराठीतील कलावंताचे पहिले आत्मचरित्र... निर्मिती, वितरण, प्रदर्शन आणि सरतेशेवटी अभिनय अशी चित्रपटाची विविध अंगे त्यांना अवगत होती. त्यांचे वाचनही दांडगे होते. चित्रपट कथेची त्यांना उत्तम जाण होती.

**विश्राम बेडेकर** यांचे **'एक झाड आणि दोन पक्षी'** हे आत्मचरित्र म्हणजे गाजलेली साहित्यकृतीच होय. **राम गबाले**-दिग्दर्शक, निर्माता आणि लेखक यांनी फिल्म, व्हिडीओ आणि टी.व्ही. या तिन्ही माध्यमांसाठी लेखन केले आहे. **'आत्मचित्र'** या पुस्तकात त्यांनी आयुष्यातले असंख्य प्रसंग सांगतानाच जाता जाता चित्रपटाविषयी मौलिक मार्गदर्शनही केले आहे.

**'अनंत आठवणी'** हे **अनंत माने** यांचं आत्मचरित्रपर पुस्तक प्रभातकालापासूनचा हा एक रंजक इतिहास आहे. कथा, पटकथा लेखनापासून दिग्दर्शन संकलन या सगळ्या पातळ्यांवरचा अनुभव त्यांनी ओघवत्या शैलीत कथन केला आहे.

**'धाकटी पाती'** (भाग १ व २), **सूर्यकांत मांढरे**. हे मांढरे यांचं आत्मकथनपर पुस्तक. अनेक चित्रपटातील आघाडीचा हिरो आणि पुढे चरित्र अभिनेता. संपूर्ण चित्रपट कालावधीचा आढावा घेतानाच त्यांनी जुन्या-नव्या अनेक चित्रपटांच्या निर्मिती प्रक्रिया आणि बरोबरीच्या तंत्रज्ञ आणि कलावंतांचं केलेलं चित्रण एक प्रकारे चित्रपट कलेची पाठशालाच म्हणावी असे आहे.

**'सांगत्ये ऐका' - हंसा वाडकर**. या आत्मचरित्रात हंसा वाडकर यांनी आपले चित्रपटसृष्टीतले भले-बुरे अनुभव अगदी दिलखुलासपणे सांगितले आहेत. आयुष्यातील विविध वळणे, सुख-दुःखे यांचे वर्णन केले आहे. पुरुषजात स्त्री देहाला कशी लालचावलेली आहे हे अनेक उदाहरणांवरुन सांगितले आहे. न्यायदान करणारेसुद्धा लंपटपणाने असहाय्य स्त्रीवर कसा अत्याचार करतात हेही सांगितले आहे. एकूणच

कथानकातील मोकळेपणा अनुभव कथनात जिवंतपणा निर्माण करतो.

**'अशी मी जयश्री' - जयश्री गडकर.** जयश्री गडकर यांनी आघाडीच्या अभिनेत्री म्हणून मोठा कालखंड गाजवला. मराठी चित्रपटसृष्टीचा त्या चालता बोलता इतिहास होय. त्यांच्या अनुभवांचं कथन श्री. वसंत भालेकर यांनी केलं आहे. चित्रपट निर्मिती आणि कलावंतांची अदाकारी तसेच दिग्दर्शक, कॅमेरामन यांच्या विषयी खूप माहीतीप्रद असे हे पुस्तक आहे.

चित्रपटसृष्टीतील कलावंत, दिग्दर्शक आणि तंत्रज्ञ यांच्याविषयी माहीती सांगणाऱ्या तसेच त्यांच्या मुलाखतीमधून त्यांचे जीवनदर्शन घडविणाऱ्या ग्रंथांचाही परामर्श घेतला आहे.

'भुलाये न बने' लेखक - सुधाकर अनवलीकर, 'रुपेरी' ले.-रेखा देशपांडे, 'मुलाखत आणि शद्बांकन' ले.-श्रीराम ग. पर्चिंद्रे, 'कलामहर्षि बाबूराव पेंटर' ले.-ग. रं. भिडे आणि बाबा गजबर, 'फिल्मोत्सव' ले.- भाई भगत, 'सिनेमाची गोष्ट' ले.-अनिल झणकर, 'सिनेमा' ले.-इसाक मुजावर आणि 'चित्रपट रसग्रहण' ले.-नामदेव व्हटकर इ. पुस्तकांतील महत्त्वाच्या भागांचा अभ्यास केला आहे.

चित्रपटांविषयी, चित्रपटनिर्मिती तंत्राविषयी इत्यंभूत माहीती देणाऱ्या काही ग्रंथांचाही अभ्यास करण्यात आला. 'बखर सिनेमाची' ले. -वसंत साठे, 'भारतीय चित्रपट' ले.- माधव शेवाळे, 'माध्यम दृष्टीक्षेप' ले. - वि. ल. धारुरकर, 'अभिनय कसा करावा' ले.- गजानन जागीरदार तसेच विजय दीक्षित, अशोक राणे आणि डॉ. अनिल संपकाळ यांच्या पुस्तकांचाही परामर्श घेणेत आला आहे. याशिवाय 'वास्तव रुपवाणी - चित्रपट विशेषांक' यासारख्या विविध अंकांचाही परामर्श घेण्यात आला आहे.

शेवटी या शोध प्रबंधाचे वेगळेपण काय आहे तेही वर्णन केले आहे.

## प्रकरण चौथे - चित्रपट निर्मितीचा इतिहास आणि विकास

कोणताही इतिहास हा मानवाच्या विचार संक्रमणाचा साक्षीदार असतो. निरनिराळ्या शोधाला मानवी बुद्धी कारणीभूत झाली आहे. तसेच 'गरज ही शोधाची जननी आहे' असे म्हणतात. मानव जसजसा विकसीत होत गेला तसा संवाद आणि जनसंवाद साधनेही त्याने त्याच्या अफाट बुद्धिमत्तेद्वारा विकसीत केली.

नवनवीन गरजा निर्माण झाल्याने त्यातून संवाद विकसीत होत गेला आणि संवादातून

मानवाचा सांस्कृतिक विकास घडत गेला. हा विकास प्रगत साधनांच्या विकासामुळे झपाट्याने बदलत गेला आहे. बीनतारी यंत्रणेचा शोध, दूरध्वनीचा शोध, नभोवाणीचा शोध याच बरोबरीने चित्रपटाच्या माध्यमातही वेळोवेळी नवनवे शोध लागत आजच्या इलेक्ट्रॉनिक माध्यमातल्या प्रगल्भ सिनेतंत्राचा आपण लाभ घेत आहोत.

इलेक्ट्रॉनिक्स व संगणक यांनी तर सारे जगच एखाद्या छोट्या गावासारखे छोटेसे करुन सोडले आहे. प्रथम चित्र मग चलत्‌चित्र, मग मूक चित्र त्यानंतर त्याला ध्वनीची जोड, प्रथम श्वेत-धवल आणि त्यानंतर त्यात रंगाचे युग असे करत करत आजमितीस आपण डिजीटल व डॉल्बी यंत्रणेपर्यंतचा चित्रपटाचा प्रवास इतिहासरुपाने पाहू शकतो.

या ठिकाणी चित्रपट माध्यमाच्या जन्मापासून त्याचा विकास कसा कसा घडत गेला त्याचा आढावा घेतला आहे.

मानवाने निर्माण केलेल्या महान कलांमधील चित्रपट ही सर्वात तरुण कला आहे. साधारणपणे १८९५-९६ मध्ये जन्म पावलेल्या या आधुनिक कलेनं आता २००९ मध्ये ११५ व्या वर्षात पदार्पण केले आहे. सिनेमा या कलेला सर्वात तरुण म्हणण्याचं कारण की- संगीत, चित्रकला, नृत्यकला, नाट्यकला यासारख्या कलांचा स्वत:चा हजारो वर्षांचा इतिहास आहे. मानवाच्या असंख्य पिढ्या प्रत्येक पिढीगणिक विकसीत होत गेल्या. त्याचबरोबर या कला हळूहळू विकसीत होत गेल्या; परंतु सिनेमा ही अशी कला आहे की, जी जन्मानंतर झपाट्याने वाढत जाऊन अवघ्या ११५ वर्षांत एका सन्माननीय आणि सर्वव्यापी अशा अवस्थेप्रत ती येऊन पोहोचली आहे. आज तर इलेक्ट्रॉनिक माध्यमांच्या विकासामुळे तिला इतकी गती आली आहे की, जगाच्या कानाकोपऱ्याचा अंदाज घेतला तर सिनेमा ही कला दिवसा-दिवसांगणिक नवनवे रुप, नवनवे वेष धारण करीत आहे.

मे ब्रिज आणि मिसोनेर यांच्या प्रयत्नांतून हालत्या चित्रांची कल्पना आली. पीटर मार्क रोगेर ने Persistance of Vision म्हणजे दृष्टीसातत्याचा शोध लावला.

आपल्या दृष्टीपटलावर पडलेली प्रतीमा १/८ ते १/१० सेकंद टिकते ही प्रतिमा शिल्लक असताना ताबडतोब दुसरी, ताबडतोब तिसरी अशा क्रमाने प्रतिमा दृष्टीपटलावर उमटत राहील्या तर दृष्टीसातत्यामुळे चित्र हलत असल्याचा भास निर्माण होतो. हे हलत्या चित्रांचे तत्त्वच चित्रपटात चित्रिकरणासाठी वापरलेले आहे. चित्रपटात सेकंदाला २४

चित्रे आपल्या डोळ्यांपुढून सरकवली जातात. थॉमस एडिसन, वुडहील लॅथॅम, जॉर्ज मेलिस, एडविन पोर्टर आणि डेव्हीड ग्रिफीथ यांनी बोलपटापर्यंतचे शोध कसे लावले त्याचा मनोरंजक इतिहास येथे दिलेला आहे.

यानंतर मूकपटाचा जमाना १९१३ ते १९३१ पर्यंतचा, याची ऐतिहासिक पाहणी केली आहे.

हॉलीवुडमध्ये डेव्हीड ग्रिफीथ आणि भारतात दादासाहेब फाळके यांच्या कर्तृत्वाचा आलेख येथे वर्णिला आहे. या काळातील मूकपटांचा आढावा १९२९ च्या प्रभातच्या स्थापनेपर्यंत घेतला आहे.

व्ही. शांताराम, फत्तेलाल, दामले आणि धायबर यांनी १९२९ मध्ये प्रभात फिल्म कंपनीची स्थापना केली. प्रभातने ३६ मूकपट तयार केले. त्यानंतर महाराष्ट्र फिल्म कंपनीच्या मूकपट निर्मितीचा आढावा घेतला आहे.

बाबूराव पेंढारकर, विनायक, अत्रे, व्ही. शांताराम, भालजी पेंढारकर, राजा परांजपे, शिंदे बंधु आणि राजा ठाकूर यांच्या चित्रनिर्मितीचा आढावा घेतला.

यानंतर दादा कोंडके यांचा झंझावात सुरु झाला. सोंगाड्याच्या अभुतपूर्व यशानंतर पुढच्या दहा वर्षांत सलग आठ रौप्यमहोत्सवी चित्रपट निर्माण करुन त्यांनी हिंदीलाही स्पर्धा आणि दहशत निर्माण केली.

हा ओघवता परामर्श १९३२ ते १९७२ पर्यंतच्या मराठी बोलपटांचा होता. इथून पुढे चित्रपट रंगीत होऊ लागला.

रंगाच्या जमान्यातील मराठी चित्रपटांचा आढावा यानंतर घेतला. व्ही. शांताराम, जब्बार पटेल, अमोल पालेकर, सचिन पिळगावकर, महेश कोठारे, एन्. एस्. वैद्य अशा अनेक दिग्दर्शकांच्या रंगीत चित्रपटांचा इतिहास पाहिला.

यानंतर जमाना सुरु होतो नव्या सहस्त्रकाचा- इ.स. २००० नंतरच्या चित्रपटांचा म्हणजे सध्याच्या कालापर्यंतचा. नव्या सहस्त्रकातील मराठी चित्रपटात उत्साहवर्धक, आशादायक बदल होत चाललेले आहेत. मराठी चित्रपट बदलत आहे, तो आशयातील बदल आहे, सादरीकरणात आहे, विषयात आहे, अभिनयात आहे, संगीतात आहे. मराठी चित्रपट श्रीमंत होत आहे.

ध्यासपर्व, अस्तित्व, मृगजळ, देवकी, एक होती वादी, झंझावात, १० वी फ,

वास्तुपुरुष, भेट, सत्तेसाठी काहीही, नॉट ओन्ली मिसेस राऊत आणि अनाहत याबरोबरच ऑस्करपर्यंत धडक मारलेला श्वास यांच्यापर्यंतच्या चित्रपटांचा आढावा घेतलेला आहे.

इ.स.२००४ मध्ये मराठी चित्रपटाने निर्मितीचा विक्रमी आकडा गाठला. जवळजवळ ५५ चित्रपट यावर्षी सेन्सॉरसंमत झाले. वाखाणण्यासारखे चित्रपट म्हणजे -देवदासी, पांढर, देवराई, चकवा, अगं बाई अरेच्या आणि सलाम द सॅल्यूट इ.

इ.स. २००५ मध्ये जवळजवळ ६० चित्रपट सेन्सॉरसंमत झाले. नवरा माझा नवसाचा, पक् पक् पकाक, खबरदार, कायद्याचं बोला, आम्ही असू लाडके आणि डोंबिवली फास्ट हे विशेष वाखाणण्यासारखे चित्रपट.

मराठी चित्रपट निर्मितीचा धुमधडाका आत्ताच्या क्षणापर्यंत चालूच आहे. असा हा चित्रपट निर्मितीचा इतिहास आणि विकास व त्यातील मराठी चित्रपटाची वाटचाल.

## प्रकरण पाचवे - क्षेत्रीय पाहणीचा अहवाल समस्या व उपाय

प्रस्तुत शोधप्रबंधात मराठी चित्रपटाच्या वाटचालीचा अभ्यास करतानाच मराठी चित्रपट निर्मितीच्या समस्यांचा शोध घ्यावयाचा आहे. यासाठी इ.स. २००० पासून पुढील मराठी चित्रपटांचा अभ्यास करुन, विशेष लक्ष २००१ ते २००५ या कालावधीतील मराठी चित्रपट निर्मितीकडे दिले आहे व त्यातून विविध समस्यांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रत्येक काळात त्या त्या समस्या वेगवेगळ्या पद्धतीने समोर येत गेल्या व त्यावर तोडगा काढतच चित्रपटनिर्मिती पुढे पुढे सरकत राहीली.

यशस्वी चित्रपटाचे गणित कुणालाच सापडलेले नाही पण निर्मात्याच्या दृष्टीनेच नव्हे तर तंत्रज्ञ, कलावंत आणि एकूणच समाजाच्या दृष्टीने चित्रपट व्यवसाय यशस्वी होणे ही काळाची गरज आहे आणि म्हणूनच मराठी चित्रपट निर्मिती प्रक्रियेतील समस्यांचा शोध क्षेत्रीय पाहणीत घेतलेला आहे.

मराठी चित्रपट निर्मिती क्षेत्राशी संबंधित निर्माते, दिग्दर्शक, छायाचित्रकार थोडक्यात तंत्रज्ञ आणि कलावंत तसेच शिक्षक, प्राध्यापक, जाणकार रसिक, पत्रकार आणि समिक्षक अशा शंभर जणांचे सर्वेक्षण प्रश्नावलीच्या आधारे केले.

यासाठीची प्रश्नावली परिशिष्ठामध्ये जोडलेली आहे. कोल्हापूर शहर आणि कोल्हापूर परिसरातील चित्रीकरणानिमित्त येणाऱ्या शंभर व्यक्तिंची यासाठी निवड केली.

या प्रश्नावली १०० जणांकडून भरुन घेतल्यानंतर त्यांचा सुसंगत असा अभ्यास करण्यात आला. त्यात त्यांनी दिलेल्या पर्यायाप्रमाणे तालिका तयार केल्या आणि त्यांचे आलेख काढून विश्लेषण करण्यात आले.

यानंतर अंतर्दृष्टीस चालना देणाऱ्या घटकांचा विचार करण्यात आला.

मराठी चित्रपट क्षेत्राविषयी अनुभवी, तज्ज्ञ आणि अभ्यासू अशा व्यक्तिंच्या प्रत्यक्ष मुलाखती घेतल्या. मुलाखतीं दरम्यान मराठी चित्रपट निर्मितीच्या समस्या आणि त्यावरील उपाययोजना जाणून घेण्यासाठी पुढीलप्रमाणे दहा प्रश्न विचारण्यात आले.

१) आजच्या मराठी चित्रपट निर्मिती प्रक्रियेतील समस्या कोणत्या आहेत असे आपणास वाटते?

२) 'आजची मराठी चित्रपटांची परिस्थिती' याविषयी आपले मत काय?

३) इतर प्रादेशिक चित्रपट निर्मिती आणि हिंदी चित्रपटनिर्मिती यांच्याशी तुलना करावयाची झाल्यास मराठी चित्रपट कोठे आहे असे आपणास वाटते?

४) मराठी चित्रपट जागतिक पातळीवर भरीव कामगिरी करू शकेल काय? उदा. ऑस्कर पारितोषिक पात्र होईल काय?

५) मराठी चित्रपटांच्या विकासासाठी शासनाकडून आपल्याला काय अपेक्षा आहेत?

६) शिक्षक / प्राध्यापक, पत्रकार आणि समिक्षक यांचा मराठी चित्रपटांच्या उन्नतीसाठी कसा उपयोग करून घेता येईल?

७) प्रेक्षकवर्गाला मराठी चित्रपट पाहण्यासाठी चित्रपटगृहाकडे खेचून आणण्यासाठी काय उपाययोजना करता येतील?

८) मराठी चित्रनगरी, अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळ यांच्याकडून आपल्या काय अपेक्षा आहेत?

९) निर्माते, दिग्दर्शक, तंत्रज्ञ आणि कलाकार यांनी मराठी चित्रपटांचे स्थान उंचावण्यासाठी काय करावे असे आपणास वाटते?

१०) एकंदरीत सर्व समस्यांचा सामना करून मराठीचे सुवर्णयुग पुन्हा निर्माण व्हावे यासाठी काय करता येईल?

सर्व संशोधन प्रक्रियेनंतर - समस्यांचा चहुबाजूंनी विचार करून, समस्यांविषयी

तज्ज्ञांची असणारी उलटसुलट मतेही आजमावण्यात आली आणि मग या आधारावर उपाययोजना सुसूत्रपणे मांडण्यात आली आहे.

यात पुढील समस्यांविषयी सविस्तर विचार केलेला आहे- भांडवल समस्या, कलावंतांच्या व्यस्तपणामुळे तसेच तंत्रज्ञांच्या व्यस्तपणामुळे उद्‌भवलेल्या समस्या, स्टार कलाकार आणि तंत्रज्ञ यांच्या मनमानीमुळे निर्माण होणाऱ्या समस्या, नवे तंत्रज्ञान-याचा अभ्यास तसेच उपलब्धी आणि वाढता खर्च यामुळे निर्माण झालेल्या समस्या, विविध चित्रपट वाहिन्यांचा सुकाळ आणि सुळसुळाट व त्यांनी निर्माण केलेल्या समस्या, जाहीरात-वितरण-प्रदर्शन याबाबतीतील समस्या, चित्रपटगृहांच्या विविध समस्या, माध्यमांची उदासिनता तसेच मराठी प्रेक्षकांचा अल्प प्रतिसाद आणि उदासीनता इ. अनेक अनेक समस्यांवर सविस्तर सांगोपांग चर्चा करुन उपाययोजना शोधण्याचा आणि सुचविण्याचा प्रयत्न केलेला आहे.

प्रस्तुत सहाव्या अध्यायात इथून पुढे उपलब्ध झालेले ठळक निष्कर्ष, नवे प्रमेय, उपलब्धी आणि भावी संशोधनासाठी नव्या दिशा याविषयी चर्चा केली आहे.

## ६.३ ठळक निष्कर्ष

या लघुशोधप्रबंधासाठी काही उद्दिष्ट्ये सुनिश्चित करण्यात आली होती त्याचप्रमाणे काही गृहीतकेही समोर ठेवली होती. यानंतर या लघु शोध प्रबंधासाठी प्रश्नावली आणि मुलाखतीद्वारे सर्वेक्षण करण्यात आले संशोधनासाठी प्रकाशित साहित्यातील ग्रंथ, नियतकालीके तसेच विविध शोधप्रबंध यांचाही अभ्यास करण्यात आला. या सर्वांची फलनिष्पत्ती म्हणून पुढीलप्रमाणे ठळक निष्कर्ष प्राप्त झाले.

मराठी चित्रपट निर्मितीच्या श्रीगणेशापासून म्हणजेच मूक चित्रांच्या निर्मितीपासून आजच्या घटकेपर्यंत या व्यवसायाला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. चित्रपट निर्मिती आणि विविध समस्या यांचे अतूट नाते आहे आणि हे कधीही विभक्त होऊ शकत नाहीत हे या अभ्यासावरुन दिसून आले.

व्यापारी क्षेत्राची गणिते चित्रपट निर्मितीसारख्या व्यवसायाला लावून चालणार नाहीत, कारण कमीतकमी खर्च, जास्तीतजास्त उत्पन्न यातील फरक म्हणजे नफा हे इतर व्यापारी क्षेत्राबाबत योग्य होय, पण चित्रपटासारख्या कलाक्षेत्राने त्यातही सामाजिक

बांधिलकीस्वरुप कलाक्षेत्रात असे व्यापारी सूत्र व्यवहार्य ठरणार नाही; कारण फायद्याच्या गणितापेक्षा या चित्रपट व्यवसायाकडे सामाजिक जागृती आणि सामाजिक उन्नतीसाठी अत्यावश्यक क्षेत्र म्हणून पाहिले पाहिजे असे जाणकारांना वाटते.

नफा कमविण्यासाठी खर्च कमी व प्राप्ती (विक्री) जास्त असेल तर जास्तीतजास्त नफा मिळविता येतो; परंतु चित्रपटव्यवसायात या सूत्राप्रमाणे विचार करावयाचा झाल्यास कमीतकमी खर्चात चित्रपट काढणे म्हणजे निर्मितीमूल्येच पायदळी तुडविल्याप्रमाणे होते. यातील कलात्मकता रसातळाला जाऊन, रंजकताही कमी होत जाईल अर्थात् असा चित्रपट मग व्यावसायिक दृष्ट्याही यशस्वी ठरणार नाही आणि कलात्मक दृष्ट्याही.

मराठी चित्रपट निर्मिती प्रक्रियेतील समस्यांचा शोध घेताना प्रामुख्याने एक गोष्ट लक्षात आली की, समस्यांचं नक्की स्वरुप शोधणं फार अवघड आहे. तज्ज्ञांची याबाबतीत उलटसुलट मते आहेत तसेच समस्यांचा प्राधान्यक्रम ठरविणेही अवघड असल्याचे दिसून आले. हत्तीचे वर्णन करणाऱ्या आंधळ्यांप्रमाणे या विषयात अभ्यास करणाऱ्यांची अवस्था होते हे दृष्टोत्पत्तीस आले.

आर्थिक समस्यांचा विचार करता शासनाच्या पातळीवर खूप सहकार्याची भावना आहे. पूर्वीच्या काळी स्वबळावर चित्रपटनिर्मिती करणारे अत्यंत कसदार आणि उच्च निर्मितीमूल्ये असणारे चित्रपट तयार करत होते, त्यामानाने आज चित्रपटव्यवसायाला शासनाचे पाठबळ आहे. शिवाय इलेक्ट्रॉनिक मिडियाचे हक्क विक्रीसारखी इतरही आर्थिक सहकार्य मिळणाऱ्या बाबी आहेत. मग असे असूनही पूर्वीच्या तुलनेत आजची निर्मिती खरं म्हणजे खूप सकस व्हायला हवी, पण तसे दिसून येत नाही म्हणजेच तुटपुंज्या उत्पन्नामुळे अनेक अडचणींतून रुचकर स्वयंपाक करणारी गृहीणी आणि सर्व गोष्टींचा पुरवठा करुनही रुचकर स्वयंपाक करु न शकणारी गृहीणी असा हा प्रकार दिसतो.

शासनाचे अनुदान हे दुसऱ्या चित्रपटाला मिळते म्हणजे स्वबळावर पहिला चित्रपट तयार करुन तो प्रदर्शित झाल्यानंतर दुसऱ्या चित्रपट निर्मितीसाठी टप्प्या टप्प्याने अनुदान दिले जाते, म्हणजे पहिला चित्रपट तयार करण्याचे सामर्थ्य नसेल तर अडचण निर्माण होऊ शकते. तज्ज्ञ समितीमार्फत कथा-पटकथा-संवाद व एकंदर निर्मितीमूल्ये पाहून शासन या बाबतीत काय करु शकेल? याविषयी खूप चर्चासत्रे झाली आहेत. मराठी चित्रपट विकास महामंडळ स्थापून अशा गरजू पण लायक चित्रनिर्मात्यांना कर्जाऊ

स्वरुपाची रक्कम भांडवल म्हणून पुरवता येऊ शकेल. यासाठी चित्रपट, त्याचे भावी अनुदान आणि सर्व प्रकारचे हक्क तारण म्हणून ठेवावेत अशा अटी घालता येतील.

मराठी चित्रपटांचे वितरण आणि प्रदर्शन ही समस्या मोठी आहे. याबाबतीतही उलटसुलट मते आढळतात. विनय नेवाळकरांसारखे निर्माते चित्रपटगृहे मिळत नाहीत या विषयीही सहमत नाहीत. त्यांच्या स्वत:च्या अनुभवावरुन ते म्हणतात की, मराठीला थिएटर मिळत नाही हे सर्वस्वी चुकीचं आहे. अनेक थिएटरवाले चांगला चित्रपट आहे का? म्हणून स्वत:हून विचारणा करतात. त्यांना त्यांच्या थिएटरचं रिप्युटेशन वाढविण्यासाठी उत्तम सिनेमांची आवश्यकता असते. नुसती दर्जेदार निर्मितीच महत्त्वाची नसून मार्केटींगची तत्त्वं आत्मसात करणे आणि वापरात आणणे गरजेचे आहे. 'देवकी' या चित्रपटाच्या निर्मात्यांनी कालनिर्णय, माझी मैत्रिण, चित्रलेखा इत्यादी प्रकाशन संस्थांना सहकार्याने काही कार्यक्रम आखले आणि वितरण समस्येवर मात केली. 'भेट' चित्रपट प्रेक्षकांपर्यंत पोहचावा म्हणून परिसंवाद आणि संवाद यांचं आयोजन केलं.

सुमित्रा भावे आणि सुकथनकर तर आपल्या चित्रपटांसाठी सर्व थरातल्या प्रेक्षकांपर्यंत गेले त्यांच्या भावनांना हात घातल्यानंतर अतिशय उत्तम प्रतिसाद निर्मितीसाठी अर्थसहाय्य करण्यापासून ते चित्रपटाला गर्दी करेपर्यंत मिळाला. यातून हेच दिसतं की समस्यांचा बागुलबोवा करण्यापेक्षा समस्यांचा खंबीरपणे मुकाबला करण्यासाठी खडतर प्रयत्न आणि आत्मविश्वासाबरोबर जिद्दीचीही आवश्यकता आहे. आत्मविश्वासाच्या जोरावर कौशल्याने जनजागृती करुन रसिकांना चित्रपटगृहांकडे खेचून नेणे महत्वाचे आहे.

मराठी चित्रपट वितरण आणि प्रदर्शन याबाबतीतही शासकीय पातळीवर जाणकारांची समिती स्थापन करुन या समितीमार्फत या समस्येवर उपाययोजना करता येईल.

मराठी प्रेक्षक आळशी आहे, उदासीन आहे अशी ओरड करण्यापेक्षा त्यांच्यातील अस्मिता, जिज्ञासा आणि मराठी भाषेवरील प्रेम जागृत करुन मराठी चित्रपट पाहण्याकडे त्यांचा कल कसा वाढेल याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

'बिनधास्त' चित्रपटाने प्रसिद्धीचा नवा मापदंड निर्माण केला. तरुणांचे पाय चित्रपटगृहाकडे वळले. हळूहळू माऊथ पब्लीसिटीने उरल्या सुरल्या प्रेक्षक वर्गालाही चित्रपटगृहांकडे खेचून आणले म्हणजेच प्रसिद्धीच्या खर्चाकडे काटकसर म्हणून पाहू नये. प्रसिद्धी हा कोणत्याही व्यवसायाचा आत्मा आहे. पेरल्याशिवाय उगवत नाही आणि

प्रसिद्धीसाठी पेरल्याशिवाय फळे मिळणार नाहीत.

या अभ्यासासाठी काही गृहीतके सुनिश्चित करण्यात आली होती. संशोधन कार्य करत असताना आणि पूर्ण झाल्यावर या गृहीतकांशी ताडून पाहता अनेक निष्कर्ष प्राप्त झाले.

दादासाहेब फाळके यांच्या चित्रपट निर्मितीपासून आजच्या कालावधीपर्यंत होत असलेल्या आणि झालेल्या चित्रपटनिर्मितीचा विचार करता मराठी चित्रपट निर्मिती ही अनेक अडचणींचा सामना करत जाताना दिसते. हे पूर्णांशाने खरे असल्याचे सिद्ध झाले. वेळोवेळी समस्यांचे स्वरुप वेगवेगळी रुपे घेऊन समोर आले. यातल्या प्रमुख समस्या पाहिल्या तर-

स्त्रीभूमिकांसाठी कलाकार न मिळणे ही समस्या आजच्या घटकेला राहीलेली नाही. चित्रपटाच्या निर्मिती प्रक्रियेसाठी आणि तो पडद्यावर प्रदर्शित होईपर्यंत भांडवलाची समस्या आजही आहे. अगदी सहकार्याला शासन उभं असलं तरी मराठी चित्रपट निर्मिती संख्या वाढल्यामुळे आणि कलाकार तंत्रज्ञ वेगवेगळ्या निर्मितीत गुंतल्यामुळे त्यांच्या तारखांचा गोंधळ होणे ही मोठी समस्या आजच्या घटकेला भंडावणारी आहे. दिवसागणिक येणारे नवे तंत्रज्ञान संगणकाच्यामुळे होणाऱ्या नव्या नफा सोयी आणि तंत्रज्ञान यामुळे तंत्रज्ञांना सतत विद्यार्थी राहणे गरजेचे झाले आहे. जे या समस्येचा गांभिर्याने विचार करत नाहीत ते नामशेष होण्याच्या दिशेने चालले आहेत. वाढत्या निर्मितीमुळे आणि हिंदीच्या स्पर्धेमुळे चित्रपटगृहे मिळणे हे मधल्या कालावधीत अवघड झाले होते; परंतु सध्या मल्टिप्लेक्समध्ये एकेक वेळा तीन-तीन, चार-चार चित्रपट लागल्याचे सुखद चित्रही दिसते आहे, पण समस्या संपली किंवा मिटली असे म्हणणे धाडसाचे ठरेल. कच्च्या फिल्मच्या किंमती वाढलेल्या आहेत. उपलब्धता आहे, त्यामुळे दुसऱ्या महायुद्धानंतर फक्त १९४२ च्या आसपास या समस्येने गंभीर रुप धारण केलं होतं, तितकं आज नाही.

आज नाटकांमुळे मराठी चित्रपटांना फार मोठी समस्या नाही, पण सतत वाढत जाणारी वाहीन्यांची संख्या. रोज निरनिराळे चॅनल्स करमणुकीचा खजीना घेऊन प्रेक्षकांपुढे सादर होत आहेत यामुळे मराठी चित्रपटाच्या अस्तित्त्वापुढे मोठे संकट उभे राहिले आहे. थोडासा दिलासा म्हणजे वाहीन्यांचे, इलेक्ट्रॉनिक माध्यमांचे हक्क मिळवून बऱ्यापैकी

रक्कम आज मराठी चित्रपट निर्मात्यांना मिळू लागली आहे.

मधल्या काळात शासनाच्या कर परतीच्या व अनुदानाच्या धोरणाचा परिणाम म्हणून हौसे, नवसे, गवसे चित्रपट निर्माते निर्मितीत उतरले. मिळणाऱ्या अनुदानापेक्षा कमी खर्चात चित्रपट निर्माण करुन इथंच नफा कमवायचा. या वृत्तीमुळे मराठी चित्रपट कलात्मकता आणि नाविन्य यापासून दूर गेला; परंतु इ.स. २००० पासून म्हणजेच नव्या सहस्रकात खूप आशादायक चित्र निर्माण झाले आहे. मृगजळ, अस्तित्व, ध्यासपर्व, सत्ताधीश, देवकी, एक होती वादी, झंझावात, १० वी फ, वास्तुपुरुष, भेट, अनाहत, देवदासी, पांढर, देवराई, चकवा, नॉट ओन्ली मिसेस राऊत, श्वास, सावरखेड एक गाव, सातच्या आत घरात, अगं बाई अरेच्चा, कायद्याचं बोला, आम्ही असू लाडके, डोंबिवली फास्ट इ. कितीतरी चित्रपट इ.स. २००५ पर्यंतचे कलात्मक दर्जा आणि व्यावहारिक पातळीवरही वाखाणण्यासारखे आहेत.

या चित्रपटांनी अनेक आशयसंपन्न पटकथा आणि नवे प्रयोग मराठीत आणले याचा अर्थ मराठी चित्रपटनिर्मितीला नावे ठेवण्यासारखे काही राहीले नाही. मराठी चित्रपटसृष्टी संपन्न होऊ लागली आहे.

नव्या सहस्त्रकात नवे वारे, नवे प्रवाह सुरु झाले आहेत. कथा-पटकथा-संवाद-गीते या महत्त्वाच्या बाबींवर आजचे मराठी निर्माते-दिग्दर्शक गांभिर्याने विचार करताना दिसत आहेत. त्यामुळेच तांत्रिक सफाई देखील रसिकांच्या मनाला आनंद देणारी ठरली आहे. मराठी सिनेमा हिंदी आणि दाक्षिणात्य चित्रपटांशी कलात्मकता आणि आगळेवेगळे सादरीकरण या बाबतीत स्पर्धा करु लागला आहे.

मराठीमध्ये समाजमनाला भिडणारे व वास्तववादी चित्रपट काढण्याचा प्रयत्न सुरु झाला. मुळातच मराठी कलावंत कलेच्या बाबतीत आघाडीवर आहेत ही मराठीची जमेची बाजू आहे. या नवीन स्तुत्य अशा प्रयत्नांमुळे कलावंतांच्या बुद्धीला खाद्य पुरविणाऱ्या, कलानैपुण्यास आव्हानात्मक अशा अनेक भूमिका निर्माण झाल्या.

१९३७ ते १९४२ हा मराठी चित्रपटांचा सुवर्णकाळ मानला जातो. याच काळात प्रभात वगैरे चित्रनिर्मिती संस्थांनी आदर्शाचे आणि सामाजिक बांधिलकीचे अनेक मापदंड निर्माण केले. निकोप समाजमनाच्या निर्मितीमध्ये त्या चित्रपटांचा वाटा फार मोठा होता. नव्या सहस्रकातील विशेषत: २००१ ते २००५ या काळातील चित्रपट निर्मितीकडे पाहता

नव्या सुवर्णकालाची नांदी सुरु झाली आहे. एक नवे आशादायक वातावरण निर्माण झाले आहे.

चित्रपटातील कलाकार दूरदर्शन मालिकांकडे वळताना जसे दिसतात तसेच दूरदर्शन मालिका व नव्या वाहीन्यांतून नावारुपाला आलेले नव्या दमाचे तरुण कलावंत आणि तंत्रज्ञही मराठी चित्रपटांतून चमकू लागले आहेत.

शासनाच्या विविध योजना ज्या मराठी चित्रपटांच्या निर्मितीत सहकार्य म्हणून विचारपूर्वक तयार केलेल्या आहेत त्या प्रत्यक्षात अंमलात येताना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. कित्येकदा सवलती असून नसल्यासारखी अवस्था झाली आहे. जेवढे अनुदान त्या वर्षासाठी मंजूर केले आहे त्यापेक्षा कितीतरी कमी रक्कम मराठी चित्रपट निर्मात्यांना मिळते.

अनुदानाची मंजूर रक्कम त्या त्या वर्षात वेळच्या वेळी मिळत नाही. अनुदानासाठी हेलपाटे मारावे लागतात. त्यामुळे कधी कधी शासनाचे धोरण घातकी आणि फसवे वाटायला लागते.

शासनाच्या विविध योजना विशेषत: अनुदान योजना आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमांच्याकडून हक्क विकून मिळणारी रक्कम यांचाच विचार करुन एक अशी हवा निर्माण झाली आहे की, मराठी चित्रपटसृष्टीला खूप चांगले दिवस आले आहेत; परंतु प्रस्तुत संशोधनानंतर समस्यांच्या मूळाशी गेल्यानंतर लक्षात येते की, वस्तुस्थिती फार वेगळी आहे. 'मूठभर लक्षाधीश आणि उरलेले भिक्षाधीश' ही खरी अवस्था आहे. मोजके वरच्या थरातले चार नावाजलेले कलावंत आणि काही नावाजलेले तंत्रज्ञ यांच्या वाट्याला खूप सुबत्ता आली आहे. ते म्हणतील ती पूर्व दिशा असे चित्र दिसते आहे; परंतु उरलेल्या मोठ्या घटकांचे काय हा ज्वलंत प्रश्न आहे. दुय्यम कलाकार, दुय्यम तंत्रज्ञ आणि इतर यांच्या वाट्याला नगण्य किंवा नाममात्र रक्कम येते. कधी कधी ही रक्कम वेळेत त्यांना मिळतही नाही. मग अखिल भारतीय चित्रपट महामंडळाकडे तक्रारी नोंदवणे इत्यादी खटाटोप करणे भाग पडते.

गुणवत्तेच्या अभावी मराठी चित्रपट राष्ट्रीय आणि जागतिक पातळीवर टिकू शकत नाहीत. हे गृहीतकही या संशोधनाच्या पातळीवर तपासून पाहिले. पूर्णांशाने यात तथ्य वाटत नाही. मधल्या काही कालखंडात मराठीत तोच तोचपणा शिळ्या कढीला उत

आणण्याचा प्रकार तसेच हिंदीचे अनुकरण करण्याचा वेडावाकडा प्रयत्न यामुळे मराठी चित्रपट आपले मराठीपण हरवून बसला हे खरे आहे, पण सन्माननीय अपवादही खूप आहेत. विशेषत: इ.स.२००० नंतरच्या मराठी चित्रपट निर्मितीने गुणवत्ता, कलात्मकता व व्यावहारिकता यांचा चांगला तोल सांभाळल्याचे निदर्शनास येते.

ज्या हिंदी चित्रपटांची काहीजण भलावण करतात त्या चित्रपटांचे आधारस्तंभ आजपर्यंत मराठीतले तंत्रज्ञ आणि कलाकारच आहेत असे दिसून येते. 'संत तुकाराम'पासून ते आजच्या 'श्वास' पर्यंतच्या कित्येक मराठी चित्रकृती जागतिक पातळीवर प्रशंसेस पात्र ठरलेल्या आहेत. ड्रेपरीसाठी (वेशभूषा) भानू अथैय्या यांनी पहिले ऑस्कर भारतात आणले. असाच पराक्रम रोहीणी हट्टंगडी यांनी गांधी या चित्रपटात 'बा' ही भूमिका करुन केला. 'श्वास' चित्रपटाने ऑस्करपर्यंत मराठीचा झेंडा फडकावला. सुलोचना, नूतन, तनुजा, स्मिता पाटील, माधुरी दीक्षित, काजोल, उर्मिला मातोंडकर, सोनाली बेंद्रे, अश्विनी भावे अशा अलीकडच्या अभिनेत्र्या हिंदी चित्रपटसृष्टीला मराठीनेच दिल्या आहेत तसेच व्ही. शांताराम, अमोल पालेकर, जब्बार पटेल अशांसारखे प्रसिद्ध दिग्दर्शक हिंदीतही आपला दबदबा निर्माण करुन आहेत तसेच मा. विठ्ठल, नाना पाटेकर, मिलींद गुणाजी, अशोक सराफ, लक्ष्मीकांत बेर्डे, रमेश देव, सदाशिव अमरापूरकर, डॉ. श्रीराम लागू आणि मोहन जोशी इ. नी हिंदी चित्रपटात आपले आगळे वेगळे स्थान निर्माण केले आहे. विजय तेंडूलकरांनी कथा-पटकथा-संवाद यात आपले अद्वितीय योगदान दिले आहे. या सर्वांतून हेच निष्पन्न होते की, जागतिक पातळीवर आगळे वेगळे स्थान निर्माण करण्याची क्षमता आणि गुणवत्ता मराठी दिग्दर्शक, कलाकार आणि तंत्रज्ञात आहे. हे सर्व पाहता राष्ट्रीय आणि जागतिक पातळीवर मराठी चित्रपट आपल्या गुणवत्तेच्या जोरावर दैदिप्यमान कामगिरी करु शकेल आणि तो दिवस जास्त लांब नसावा असे या अभ्यासावरुन दिसते.

## ६.४ नवे प्रमेय -

प्रादेशिक चित्रपट निर्मितीला खूप मर्यादा आहेत. मर्यादीत प्रेक्षकवर्ग त्यामुळे मर्यादीत भांडवल यातूनच मग विविध मर्यादांना तोंड द्यावे लागते. पैसा नाही म्हणून भव्यता नाही, भव्यता नाही म्हणून प्रेक्षक नाही आणि प्रेक्षक नाही म्हणून पैसा नाही आणि

प्रादेशिक चित्रपट निर्मिती अडचणीत येते. अशा प्रकारचे हे दुष्टचक्र आहे.

विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय महोत्सवांकडे बारकाईने पाहिल्यास स्पष्टपणे दिसते की, या महोत्सवांसाठी जगाच्या कानाकोपऱ्यातून विविध भाषेतील कलाकृती सादर होतात. यातूनच मग सर्वोत्कृष्ट चित्रपट गौरविले जातात, सन्मानित केले जातात. त्यांना पारितोषिके मिळतात. याचा स्पष्ट अर्थ असा की जे सर्वोत्तम आहे त्याला भाषेचे अडसर, भाषेचे बंधन असूच शकत नाही. चित्रपट ही दृक्‌श्राव्य कला आहे. इथं कॅमेरा बोलतो. कॅमेऱ्याची स्वत:ची अंगभूत अशी एक स्वयंभू भाषा आहे जी जगभर सर्वांना कळते, तिथं भाषाभेद अडचणी निर्माण करु शकत नाही. सर्वार्थाने जे जे चांगले आहे, ते ते सर्वार्थाने चांगले अशा पद्धतीने सादर करा. चित्रपटांच्या सगळ्या घटकांतून उत्तमोत्तम द्यायचा प्रामाणिक प्रयत्न करा की, तुम्हीच जगज्जेते आहात. नव्या प्रमेयाचा शोध आणि बोध हा आहे. अखिल मानवजातीला पर्यायाने साऱ्या समाजाला जे वेगळी दिशा दाखवते, उन्नतीच्या मार्गाने जाण्याचा रस्ता दाखविते ते वस्तुनिष्ठ आणि सत्यशोधन स्वरुपात मांडले तर भाषेच्या भिंती पाडून साऱ्या जगाला ललामभूत होते, हे त्रिकालबाधीत सत्य आहे.

## ६.५ उपलब्धी

या संशोधनामुळे मराठी चित्रपटनिर्मिती प्रक्रियेच्या पडद्यावरील आणि पडद्यामागील सर्व बाजू जागरुकतेने तपासून पाहता आल्या.

मराठी चित्रपटांच्या उन्नतीसाठी, विकासासाठी अनेक गोष्टी करता येण्यासारख्या आहेत. कर्ता सवरता शासनच ही भूमिका अतिशय चुकीची आहे. स्वत: हातपाय हालविल्याशिवाय तरणोपाय नाही.

विविध अडचणींतून मार्ग काढण्यासाठी सर्वांत पहिली गरज आहे म्हणजे मराठी चित्रपट निर्मिती प्रक्रियेसंबंधीत सर्व घटकांनी आणि रसिक प्रेक्षकांनी एका व्यासपीठावर येणे गरजेचे आहे. मराठी चित्रपट विकास महामंडळे स्थापन करुन ती चांगल्या तऱ्हेने कार्य करतील हेही पाहणे गरजेचे आहे. टार्गेट ओरिएंटेड प्रत्यक्ष कृती कार्यक्रम आखून तज्ज्ञांचे वेळोवेळी मार्गदर्शन मिळवून त्याप्रमाणे कृती करण्याची गरज आहे.

आर्ट सर्कल, विविध फिल्म सोसायट्या (उदा. कलामहर्षि बाबूराव पेंटर फिल्म

सोसायटी) इ. मार्फत प्रत्यक्ष कार्यशाळा, प्रबोधन वर्गाचे आयोजन, चित्रपट समजून घेणे इ. गोष्टी घडणे आवश्यक वाटते. प्राथमिक शिक्षणापासूनच विद्यार्थ्याला त्यांच्या वयाला झेपेल अशा पद्धतीने नाट्य शिक्षण देऊन चित्रपटकलेचेही यथायोग्य ज्ञान देणे आवश्यक आहे. इतर भाषिक चांगले चित्रपट रसिकांपर्यंत पोहोचवले पाहिजेत.

## ६.६ भावी संशोधनासाठी नव्या दिशा

मराठी चित्रपट निर्मिती प्रक्रियेतील समस्यांचा शोध या लघुशोध प्रबंधात घेत असता भावी संशोधनासाठी काही महत्त्वाचे विषय डोळ्यांसमोर आले.

मराठी चित्रपट निर्मितीमध्ये अनेक घटक आहेत. या घटकांच्या अनेक पैलूंवर संशोधन करता येण्यासारखे आहे. काही ठराविक विषय पुढीलप्रमाणे आहेत.

१. मराठी चित्रपटातील निर्मितीचा अभ्यास.

२. प्रभातकालीन चित्रपट निर्मितीचा अभ्यास.

३. प्रभातकालीन चित्रपटातील सामाजिक आशय.

४. मराठी चित्रपटातील तंत्राची हाताळणी एक अभ्यासपूर्ण आढावा.

५. मराठी भाषेतील कलात्मक चित्रपटांचा प्रवास.

६. विजय तेंडूलकर यांच्या मराठी चित्रपटांच्या पटकथा : एक अभ्यास.

वरील विषय आणि त्या अनुषंगाने निर्माण होणारे इतर उपविषय या संदर्भात भावी संशोधक संशोधन करुन संशोधन क्षेत्रात मोलाची भर घालू शकतील.

***